पिंपरी चिंचवड महानगरपालिका
मा. महिला व बाल कल्याण समिती
कार्यपत्रिका क्रमांक - १२

**सभावृत्तांत**

दिनांक :- १० / १० / २०१२ वेळ :- दुपारी २.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. महिला व बाल कल्याण समितीची पाक्षिक सभा बुधवार दिनांक - १० / १० / २०१२ रोजी दुपारी २.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारती मधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा. सदस्य उपस्थित होते.

१) मा. भारती फरांदे - सभापती
२) मा. जवळकर वैशाली राहुल
३) मा. सौ. साळुंके सविता सुरेश
४) मा. सुर्यवंशी आशा ज्ञानेश्वर
५) मा. आल्हाट मंदा उत्तम
६) मा. सौ. ठाकरे मंदाकिनी अर्जुन
७) मा. काळे विमल रमेश

याशिवाय मा.सतिश कुलकर्णी - सहा.आयुक्त, मा.चाकणकर - प्र.नगरसचिव, मा.जगताप - समाज विकास अधिकारी, मा.जगदाळे - सहा. प्रकल्प अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

**उपस्थित सन्मा.सदस्यांच्या संमतीप्रमाणे खालील ऐनवेळचा विषय सभाकामकाजात दाखल करुन घेणेत आला.**

विषय क्र.२ :- महिलांच्या टॉयलेट ब्लॉकसाठी जागा तसेच लाईट, पाणी, ड्रेनेज व्यवस्था उपलब्ध करुन देणेबाबत मा.सविता साळुंके, मा.मंदा आल्हाट यांचा प्रस्ताव.

----------

**दिनांक २६/०९/२०१२ रोजी झालेल्या सभेचा ( कार्यपत्रिका क्रमांक ११ ) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा. सभापती यांनी प्रकट केले.**

----------

ठराव क्रमांक - २५ विषय क्रमांक - १
दिनांक - १०/१०/२०१२ विभाग - नागरवस्ती विकास योजना
सूचक - मा. वैशाली जवळकर अनुमोदक - मा. मंदा आल्हाट
संदर्भ - मा.महापालिका आयुक्त यांचेकडील पत्र क्र.नावियो/११/कावि/२४३/२०१२, दि.२८/०९/१२

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

महिला व बालकल्याण योजने अंतर्गत विविध योजना राबविल्या जातात महापालिका हद्दीतील मुलींना यो.क्र.०३ अन्वये मुलींना तांत्रिक प्रशिक्षणाकामी अर्थसहाय्य देणे योजने अंतर्गत ६६ पात्र लाभार्थींना प्रत्येकी र.रु. २,०००/- प्रमाणे एकूण रक्कम रुपये १,३२,०००/- (अक्षरी रक्कम रुपये एक लाख बत्तीस हजार फक्त) अदा करणेस मान्यता देणेकामी तसेच जे अर्ज कागदपत्रांच्या पुर्तते अभावी अपात्र ठरले आहेत, त्यांना कागदपत्रांचे पुर्ततेनंतर लाभ देणेस व त्याकामी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेकामी मा.स्थायी समितीकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समितीकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

**सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आलेला विषय घेणेत आला -**

ठराव क्रमांक - २६ विषय क्रमांक - २
दिनांक - १०/१०/२०१२
सूचक - मा. सविता साळुंके अनुमोदक - मा. मंदा आल्हाट
संदर्भ - मा.सविता साळुंके, मा.मंदा आल्हाट यांचा प्रस्ताव -

पिंपरी चिंचवड शहरात रोटरी क्लब मार्फत एकूण ६ ठिकाणी महिलांसाठी टॉयलेट ब्लॉक उपलब्ध करुन देण्यात येणार आहेत. यासाठी महानगरपालिकेमार्फत जागा उपलब्ध करुन देण्यास तसेच लाईट, पाणी, ड्रेनेज व्यवस्था उपलब्ध करुन देण्यास व सदरचे टॉयलेट ब्लॉक Pay & Use या तत्वावर वापरण्यास परवानगी देण्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

या नंतर मा. सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**( भारती फरांदे )**
सभापती
महिला व बालकल्याण समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८ नगरसचिव कार्यालय
क्रमांक :- नस/४/कावि/ १२६० /२०१२
दिनांक :- १० / १० / २०१२

प्र. नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८

प्रत : सर्व संबंधीत शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे
पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.